प्रेसनोट

दि.११/७/२०१९

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | अहमदनगर/नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | जामखेड पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३१०६/२०१५ |
| कलम | ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | उध्दव मारुतराव जोशी,सहायक सहकार अधिकारी,वर्ग ३,सहकारी संस्था,जामखेड,जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये ६००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ६००/— |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की,आरोपी लोकसेवक उध्दव मारुतराव जोशी, सहायक सहकार अधिकारी, वर्ग ३, सहकारी संस्था, जामखेड, जि.अहमदनगर यांनी तक्रारदार यांचेविरुध्द सहायक निबंधक सहकारी संस्था, जामखेड कार्यालयात दाखल असलेल्या सावकारीचे अर्जाच्या निकालाचे नकला देण्यासाठी तक्रारदार यांना ६००/— रुपये लाचेची मागणी केली होती. त्यावरुन तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमनगर येथील कार्यालयात तक्रार दिलेवरुन दिनांक २१/९/२०१५ रोजी सापळा आयोजीत केला असता आरोपी लोकसेवक उध्दव मारुतराव जोशी यांनी तक्रारदार यांचेकडे पंचांसमक्ष ६००/— रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम रुपये ६००/— पंचांसमक्ष स्वीकारली असता त्यांना रंगेहाथ पकडले होते. त्यांच्याविरुध्द जामखेड पो.स्टे.,जि.अहमदनगर येथे दि.२१/९/२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदर गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, अहमदनगर येथे नमुद आरोपीविरुध्द दि.५/१/२०१६ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br>सदर खटल्याची सुनावणी मा.श्री.पी.व्ही.चतुर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश ५ व सहाय्यक सत्र न्यायाधीश, अहमदनगर यांचे समोर होऊन आरोपी लोकसेवक उध्दव मारुतराव जोशी यांना आज दि.११/७/२०१९ रोजी १)ला.प्र.का. सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे ४ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व २ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद २)ला.प्र.का.सन १९८८ चे कलम १३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे ४ वर्ष सक्त मजुरीची शिक्षा व २ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली आहे.<br>सदर गुन्हयाचा तपास अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर येथील तत्कालीन पोलीस निरीक्षक श्री.व्ही.डी.मुतडक यांनी केला असून सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे अॅड.श्रीमती पी.के.कापसे, सहायक सरकारी अभियोक्ता, अहमदनगर यांनी काम पाहिले असून त्यांना महिला पो.कॉ.संध्या म्हस्के यांनी मदत केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :— acbmaharashtra.gov.in
ई—मेल ऑनलाईन तक्रार :— acbwebmail@mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन :— acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :— १०६४
दुरध्वनी क्रमांक :— ०२४१—२४२३६७७
व्हॉटस अप क्रमांक :— ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर

Scanned by CamScanner